पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ४१२ दिनांक - ०७/०६/२०२३**

## सिंहगड रोड, पोलीस स्टेशन,पुणे शहर

## मोक्यातील फरार आरोपीस तब्बल आठ महिन्यानंतर पोलीसांनी केले जेरबंद

**सिंहगड रोड पोलीस स्टेशऩ गुन्हा रजि.न.४२०/२०२२,भादवि कलम ३०७,३२६,३२४,३२३, १४३,१४५,१४७,१४९,५०४,५०६,आर्म ॲक्ट कलम ४(२५),सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३)१३५, क्रीमिनल लॉ अमेडमेंट ॲक्ट कलम ७ महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२)३(४)** मधील पाहिजे आरोपी नामे **सुरज संतोष ढवळे,वय-१९ वर्षे,रा.देशमुख प्लाझा शेजारी, साईनगर,हिंगणे-खुर्द,पुणे** हा गेली आठ महिन्यापासुन फरार असुन, त्याचा शोध तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार हे घेत होते.

दि.०४/०६/२०२३ रोजी तपास पथकातील पोलीस अधिकारी सहा.पोलीस निरीक्षक,सचिन निकम यांना त्याचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,सदर गुन्हयातील आरोपी सुरज संतोष ढवळे हा चिपळुन येथे असल्याची खाञी लायक बातमी मिळाल्याने,त्यांनी सदरची बातमी ही मा.वरिष्ठांनी कळविली असता,त्यांनी सदर ठिकाणी जावुन खाञी करुन पुढील योग्य ते कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्याअनुशंगाने सपोनि.सचिन निकम, सहा.पोलीस फौज.आबा उत्तेकर, पोलीस अंमलदार,देवा चव्हाण असे ता.चिपळुन,जि.रत्नागिरी येथे जावुन स्थानिक पोलीसांनी मदत घेवुन,सदर आरोपीचा मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जावुन शोध घेतला असता,आरोपी सुरज संतोष ढवळे यास शिताफीने पकडुन त्यास ताब्यात घेवुन त्याचेकडे दाखल गुन्हयाबाबत अधिक तपास केला असता,त्याने गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यास चिपळुन जि.रत्नागिरी येथुन ताब्यात घेतले आहे. पुढील तपास मा. सहायक पोलीस आयुक्त,श्री.राजेंद्र गलांडे, सिंहगड रोड विभाग पुणे शहर हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.पोलीस उप-आयुक्त,श्री.सुहेल शर्मा,परिमंडळ-०३,पुणे शहर, मा. सहा.पोलीस आयुक्त,सिंहगड रोड विभाग,पुणे,श्री.राजेंद्र गलांडे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.अभय महाजन, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्री.जयंत राजुरकर, सहा.पोलीस निरीक्षक,श्री. सचिन निकम, पोलीस उपनिरीक्षक,गणेश मोकाशी, सहा.पोलीस फौज.आबा उत्तेकर, पोलीस अंमलदार, संजय शिंदे, विकास पांडुळे, विकास बांदल, देवा चव्हाण, सागर शेडगे, शिवाजी क्षीरसागर, राहुल ओलेकर, स्वप्नील मगर, दक्ष पाटील, अमोल पाटील, अमित बोडरे, अविनाश कोंडे यांनी केली आहे.


सिंहगड रोड पोलीस स्टेशन
पुणे शहर